Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 3.687 (IIFS)} Vol. 36, No.1, Jan-Jun. 2019. pp 105-109

# Availability of the Basic Educational Infrastructure and Geographical Analysis of its catchment Area: Yavatmal District

Dr. Kalpana Deshmukh

***Abstract :***

*Education has its special importance in the development of human resources. Emphasis is placed on education after the basic needs ie food, clothing and shelter. Education plays a vital role in economic, social , political and cultural development. The wealth of any nation depends on the overall development of its citizens . Therefore education has been a necessary rite of life since ancient times. Merely experience in social and family life is not enough, so education institutes were established to enable the new generation to get proper education. Recently the Location – Allocation concept is used for financial and educational planning. It has two features, demand points and supply points. But now the important question arises that , Have education centers been established keeping in mind the needs of the demand centers ? There should be coordination and balance between the two ie demand and supply. For this purpose, the distribution and their catchment area of 10 th and 12 th education centers of Yavatmal District have been studied in this research paper.*

**प्रस्तावना :**

मानवी जीवन हे मानवेतर जीवनापेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणूनच मानवी जीवनात शिक्षणाला महत्वपूर्ण स्थान आहे. मानवाने आपल्या बृध्दीसामर्थ्यावर वैज्ञानिक, औद्योगिक, सांस्कृतिक प्रगती केली आणि हे सर्व शिक्षणाच्या माध्यमातुन पुढील पिढीस प्रदान करण्याची पध्दती विकसित केली. त्यामुळेच शिक्षण हा एक जीवनातील आवश्यक संस्कार बनला आहे.

प्रगत राष्ट्रांची शिक्षण पध्दती कार्यक्षम व समृध्द असते. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात ती तशी असतेच असे नाही. आज उच्चशिक्षण हे सामाजिक सुधारणेचे साधन आहे याची जाणिव सर्वच समाजस्तरांमध्ये निर्माण झाली. कारण शिक्षण हे समाजात जागृकता, सजगता आणि सामाजिक बदल घडवून आणनारा मुख्य स्त्रोत आहे. शिक्षणाने लोकांची नविन कौशल्ये, शिकण्याची क्षमता वृध्दिंगत होते व त्यायोगे बाहय पर्यावरणावर नियंत्रण ठेवणे शक्य होते.

यादृष्टीने यवतमाळ जिल्हयातील शिक्षण केंद्राचे वितरण अभ्यासण्याकरिता, उच्चशिक्षणाचा पाया असलेली दहवी व बारावीची केंद्रे, विचारात घेऊन त्यांचे जिल्हयातील वितरण अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी यवतमाळ जिल्हयातील सोळा तालुक्यांमध्ये शिक्षण केंद्राचे वितरण कसे झाले आहे तद्वतच तालुकानिहाय लोकसंख्या त्यानुसार झालेले शिक्षण केंद्राचे वितरण शिक्षण केंद्रातील भौगोलिक अंतर व त्यानुसार प्रत्येक तालुक्याचे शैक्षणिक केंद्राचे प्रभाव क्षेत्र कसे आहे, त्या प्रत्येक प्रभाव क्षेत्रात किती दहावी व बारावीची केंद्रे येतात. याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

१. शैक्षणिक केंद्रांच्या विरणाचा अभ्यास करणे.

२. शैक्षणिक सुविधांमध्ये अंतराचे महत्व शोधणे.

३. उच्च शिक्षणाचा पाया समजली जाणाऱ्या दहावी व बारावी या शैक्षणिक केंद्राच्या वितरणातील असामनतेचा अभ्यास करणे.

४. शिक्षण केंद्राचे प्रभावक्षेत्र व त्यातील शिक्षण केंद्राची संख्या यांचा अभ्यास करणे.

**माहिती संकलन व संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध व्दितीयक रूपाच्या आकडेवारीवर आधारित आहे. शोधनिबंधाचा विषय दहावी व बारावी ची केंद्रे त्यांचे वितरण व प्रभावक्षेत्र असा असल्याने संख्याशास्त्रीय पध्दतीचा व संख्यशास्त्रीय सुत्रांचा वापर केला आहे. त्याव्दारे समंकाचे संकलन, रूपांतरण, सारणीपध्दती व नकाशा पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी लागणारी आकडेवारी जिल्हा, आर्थिक व सामाजिक समालोचन, जनगणना पुस्तीका, यवतमाळ जिल्हा गॅझेटियर, जिल्हा शिक्षण विभाग येथुन संकलित केली आहे.

**अभ्यास क्षेत्र :** यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील पश्चिम विदर्भात येतो. जिल्हाचा अक्षवृत्तीय विस्तार १९°–२६′ ते २०°– ४२′ उत्तर अक्षांश तर रेखावृत्तीय विस्तार ७७°–१८′ ते ७९° – ९′ पूर्व रेखांश असा येतो. जिल्हाचे क्षेत्रफळ १३५१९ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाचा ४.४ टक्के भाग व्यापतो. जिल्हयात एकूण १६ तालुके आहेत. जिल्हयाच्या उत्तर सीमेवर वर्धा नदी तर दक्षिण सीमेवर पैनगंगा नदी वाहते.

**विषय विवेचन :**

यवतमाळ जिल्हयातील सोळा तालुक्यांमध्ये शिक्षण केंद्राचे (दहावी व बारावी) प्रभावक्षेत्र दाखविण्यासाठी खालील सांखिकी सुत्राचा अवलंब करून प्रत्येक प्रभाव क्षेत्रात येणारी शिक्षण केंद्र सारणी क्र. १ मधे दिलेली आहेत.

पायाभूत प्रभावक्षेत्र व पायाभूत शिक्षण केंद्रे

सारणी क्र. १

| अ.क्र. | तहसिल | तालुक्याच्या प्रभागाचे क्षेत्रफळ चौ.मी. | प्रभागातील दहावी केंद्र | प्रभागातील बारावी केंद्र |
|---|---|---|---|---|
| १ | यवतमाळ | २६७५ | ६७ | ११ |
| २ | बाभुळगांव | ४५० | १० | ०४ |
| ३ | कळंब | २०० | ११ | ०२ |
| ४ | राळेगांव | ४५० | १७ | ०३ |
| ५ | मारेगांव | ६०० | १५ | ०३ |
| ६ | वणी | ८७५ | २६ | ०५ |
| ७ | पांढरकवडा | ११६४ | ३२ | ०४ |
| ८ | घाटंजी | ८५० | २६ | ०३ |
| ९ | उमरखेड | १२०० | ३१ | ०७ |
| १० | महागांव | ४०० | १४ | ०३ |
| ११ | पुसद | १७५० | ४४ | १० |
| १२ | दिग्रस | ३०० | ३० | ०५ |
| १३ | दारव्हा | ८५० | १३ | ०५ |
| १४ | नेर | ४५० | ०९ | ०३ |
| १५ | झरीजामणी | ४०० | ०९ | ०२ |
| १६ | आर्णी | ९२५ | २७ | ०४ |

यवतमाळ जिल्हयातील प्रत्येक तालुका प्रभाग क्षेत्रात येणारी मुलभूत शिक्षण केंद्र यांचा अभ्यास करताना त्यांची संख्या फार कमी असलेली दिसते. मुलभूत शिक्षण केंद्राचे एकूण सोळा प्रभाग पडतात. प्रत्येक प्रभागामध्ये येणाऱ्या शिक्षण केंद्राच्या संख्या व त्या शिक्षण केंद्राकडे किती क्षेत्रफळातील लोक आकर्षित होतात ते सारणी क्र. १ मध्ये दर्शविले आहे. यवतमाळ तालुक्याचे प्रभावक्षेत्र हे सर्वात मोठे आहे. या प्रभागाने जिल्हयाच्या एकूण क्षेत्रफळाच्या १९.७५ टक्के (२६७५ चौ.कि.मी.) क्षेत्र व्यापलेले आहे. आणि या प्रभावक्षेत्रात दहावी केंद्रांची संख्या ६७ असून बारावीची ११ केंद्र आहेत. या शिक्षण केंद्राकडे १९.७५ टक्के क्षेत्रफळातील लोक आकर्षित होतात. यवतमाळ शिवाय अन्य प्रभाग क्षेत्रात शहरीकरण व शिक्षण केंद्र यात वाढ झाली असल्याने यवतमाळच्या खालोखाल पुसदचे प्रभाग क्षेत्र मोठे येते. पुसद हा यवतमाळपेक्षा लहान तालुका असला तरी शिक्षणाचा प्रसार व प्रचार तेथे अधिक झाला. पुसद प्रभागाने जिल्हयाच्या क्षेत्रफळाचा १२.९२ टक्के भाग व्यापला आहे. या क्षेत्रातील विद्यार्थी पुसद प्रभागाकडे शिक्षणासाठी आकर्षित होतात. या विद्यार्थ्यांना मुलभूत शिक्षणच्या सोयींचा लाभ घेण्यासाठी ४४ दहावीची व १० बारावीची केंद्र उपलब्ध आहेत.

पुसद खालोखाल उमरखेड व पांढरकवडा ही प्रभाव क्षेत्रे मोठी आहेत. उमरखेड या प्रभाग क्षेत्रात ३१ दहावीची केंद्र आहेत तर ७ बारावीची या प्रभाव जिल्हयाच्या क्षेत्रफळाचा ८.८६ टक्के ( १२०० चौ.कि.मी.) क्षेत्रफळातील विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेतात तर पांढरकवडा प्रभागक्षेत्रात ३२ दहावीची व ४ बारावीची केंद्र येतात. जिल्हाच्या क्षेत्रफळाच्या ८.५९ टक्के (११६४ चौ.कि.मी.) क्षेत्रातील विद्यार्थी या मुलभूत शिक्षण सुविधाचा लाभ घेतात. इतर प्रभाव क्षेत्रामध्ये आर्णी, वणी, घाटंजी, आणि दारव्हा यांच्या प्रभाव क्षेत्राने जिल्हयाच्या क्षेत्रफळाच्या अनुक्रमे ६.८३ टक्के (९२५ चौ.कि.मी.), ६.४६ टक्के (८७५ चौ.कि.मी.), ६.२७ टक्के (८५० चौ.कि.मी.) आणि ६.२७ टक्के (८५० चौ.कि.मी.) क्षेत्र व्यापलेले आहे. वणी प्रभाव क्षेत्रात ६.४६ क्षेत्रफळातील विद्यार्थी २६ दहावी व ५ बारावी केंद्राचा लाभ घेतात. घाटंजी प्रभाव क्षेत्रातील २६ दहावीच्या व ३ बारावीच्या केंद्राकडे ६.२७ टक्के क्षेत्रफळातील विद्यार्थी मुलभूत शिक्षण सुविधांचा लाभ घेण्यासाठी येतात. तर दारव्हा प्रभावक्षेत्रात येणाऱ्या ३० दहावी केंद्र व ५ बारावी केंद्राकडे ६.२७ टक्के क्षेत्रातील विद्यार्थी आकर्षिले जातात.

आर्णी प्रभावक्षेत्र थोडे मोठे असून जिल्हयाच्या ६.८३ टक्के क्षेत्रातील विद्यार्थी या प्रभाव क्षेत्रात येणाऱ्या २७ दहावी व ४ बारावी केंद्राकडे आकर्षिले जातात.


जिल्हयातील उर्वरित प्रभाव क्षेत्राचे क्षेत्रफळ फार कमी आहे. यात मारेगाव ४.४३ टक्के (६०० चौ.कि.मी.) नेर ३.४० टक्के, (४५० चौ.कि.मी.), राळेगांव व बाभुळगांव यांनी प्रत्येकी ३.३२ टक्के (४५०चौ.कि.मी.) महागाव व झरीजामणी यांनी प्रत्येक २.९५ टक्के, दिग्रस २.२१ (३०० चौ.कि.मी.) कळंब तालुक्याचे आहे. त्याने जिल्हयाचा फक्त १.४७ टक्के क्षेत्रातील विद्यार्थ्यांना लाभ घेण्यासाठी येथे दहावीची ११ केंद्रे व बारावीची २ केंद्रे उपलब्ध आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की, जिल्हयात यवतमाळ प्रभाव क्षेत्रात येणाच्या मुलभूत शिक्षण सुविधा जास्त आहेत. सर्वात कमी सुविधा झरीजामणी या प्रभाव क्षेत्रात येतात. सर्वात लहान असणाऱ्या कळंबच्या प्रभाव क्षेत्रात मात्र झरीजामणी प्रभाव क्षेत्रापेक्षा अधिक शिक्षण सुविधा उपलब्ध आहे. नकाशा क्र. १ मधे मुलभूत शिक्षण सुविधाची संख्या व शिक्षण सुविधेकडे आकर्षित होणाऱ्या प्रभाव क्षेत्र दाखविले आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, जिल्हयात यवतमाळ प्रभावक्षेत्रात येणाच्या मुलभूत शिक्षण सुविधा

जास्त आहेत. सर्वात कमी सुविधा झरीजामणी या प्रभाव क्षेत्रात सर्वात लहान असणाऱ्या कळंबच्या प्रभाव क्षेत्रात मात्र झरीजामणी प्रभाव क्षेत्रापेक्षा अधिक शिक्षण सुविधा उपलब्ध आहे. नकाश क्र. १ मधे मुलभूत शिक्षण सुविधची संख्या व शिक्षण सुविधाकडे आकर्षित होणाऱ्या लोकांचे प्रभाव क्षेत्र दाखविले आहे.

पायाभूत शिक्षण सुविधा केंद्र व प्रभाव क्षेत्र




| अ.क्र. | तालुका नावे | अ.क्र. | तालुका नावे |
|---|---|---|---|
| 1 | यवतमाळ | 9 | उमरखेड |
| 2 | बाभुळगांव | 10 | महागांव |
| 3 | कळंब | 11 | पूसद |
| 4 | राळेगांव | 12 | दिग्रस |
| 5 | मारेगांव | 13 | दारव्हा |
| 6 | वणी | 14 | नेर |
| 7 | पांढरकवडा | 15 | झरी जामणी |
| 8 | घाटंजी | 16 | आर्णि |

नकाशा क्र. १

**निष्कर्ष :**

१ यवतमाळ हे जिल्हयाचे ठिकाण असल्याने यवतमाळ तालुक्यातील मुलभुत शिक्षण सुविधांची संख्या सर्वाधिक आहे.

२ असे असले तरी यवतमाळ खालोखाल पुसद तालुक्यातील मुलभूत शिक्षण सुविधा अधिक आहेत.

३ सुगमता व संपर्कता यांचे अधिक्य असल्याने यवतमाळचे प्रभावक्षेत्र सर्वात मोठे आहे.

४ यवतमाळ स्थान जिल्हयाच्या मध्यभागी येत असल्याने आजुबाजुच्या प्रदेशातील लोक या प्रभागाकडे अधिक आकर्षित होतात.

**संदर्भ :**


1 Pandey P.N. (1988) : Eduction and Social Mobility", A Text with Reference to scheduled castes, P. 96

2 Tilak J.B. G (1982), Eduction and Rural Development, man and Derelopment, Vol. 4, No. 4 (December), P.P. 65, 78.

३ अकोलकर ग.वि. (१९७४) : महाराष्ट्रातील शिक्षणाची वाटचाल, पृ. २०

4. Balan K (1990) Education, National Integration and development, A shish publishing House, New Delhi.

५ जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, यवतमाळ जिल्हा.



Prof.Dr. Kalpana Deshmukh
Head of Department of Geography
Babaji Datey kala ani wanijya Mahavidyalay
Yavatmal